मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# झोपडपट्टी सेवा कर वसुलीत PCMC चा नवा विक्रम!

## सहा महिन्यांत २६.१५ लाखांची वसुली; ऑनलाइन करभरण्याला प्रतिसाद

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये झोपडपट्टी सेवा कर संकलनासाठी ऑनलाइन सुविधेचा प्रभावी वापर करण्यात येत असून, झोपडपट्टीवासीयांचा या सुविधेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत ऑनलाइन माध्यमातून ४२२ पावत्यांद्वारे १२ लाख ४९ हजार ७६२ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे.**



तर १ एप्रिल २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून एकूण ८३१ पावत्यांद्वारे २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा झोपडपट्टी सेवा कर महापालिकेकडे जमा झाला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने यंदा सेवा कर भरण्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. यामध्ये ऑनलाइन सुविधेला चांगला प्रतिसाद मिळाला. ऑनलाइन सुविधेमुळे कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेळेची बचत करणारी ठरली. ऑनलाइन पद्धतीने कर भरणाऱ्यांची संख्या वाढत असून, नागरिकांना डिजिटल माध्यमातून सेवा कर भरण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

झोपडपट्टी सेवा कर संकलन अधिक प्रभावी करण्यासाठी ऑनलाइन सुविधांचा विस्तार, नागरिकांमध्ये जनजागृती, कर भरण्यासाठी उपलब्ध सुविधांची माहिती पोहोचविणे तसेच थकबाकी वसुलीचा नियमित आढावा घेण्यावर झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाकडून विशेष भर देण्यात आला. त्यामुळे यंदा आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत विक्रमी वसुली झाली आहे. यापूर्वी आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २५ लाख ३७ हजार २४८ रुपये, २०२३-२४ मध्ये २५ लाख २७ हजार ३८८ रुपये, २०२४-२५ मध्ये १० लाख १४ हजार ९६७ रुपये वसुली झाली होती. तर यावर्षी म्हणजेच २०२६-२७ च्या पहिल्या सहामाहीत २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे.

### बचत गटांच्या महिलांसाठी रोजगाराचा नवा मार्ग

महिला बचत गटातील महिलांमार्फत झोपडपट्टी सेवा कराची बिले वाटप करण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये सेवा कर भरण्याबाबत जनजागृती होत असून, झोपडपट्टीतील महिलांना रोजगाराची संधीही उपलब्ध होत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी ठरत आहे.

“झोपडपट्टी सेवा कराची वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी ऑनलाइन सुविधांचा विस्तार, करदात्यांमध्ये जनजागृती आणि थकबाकी वसुलीचा सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. पहिल्या सहामाहीत झालेली २६ लाख १५ हजार रुपयांची वसुली ही या प्रयत्नांना मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आहे. करदात्यांना सुलभ पद्धतीने सेवा कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देत वसुली प्रक्रिया अधिक गतिमान करण्यावर महापालिकेचा भर राहणार आहे.”

-डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

“झोपडपट्टी सेवा कर भरण्याची प्रक्रिया नागरिकांसाठी अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी महापालिकेकडून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना घरबसल्या सेवा कर भरणे शक्य झाले आहे. या सुविधेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी आवश्यक जनजागृती आणि मार्गदर्शन करण्यात येत आहे.”

-तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

“झोपडपट्टी सेवा कर संकलनासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत ८३१ पावत्यांद्वारे २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे. करदात्यांपर्यंत आवश्यक माहिती पोहोचविणे, कर भरण्यासाठी उपलब्ध सुविधांची माहिती देणे आणि थकबाकीचा नियमित आढावा घेणे यामुळे वसुली प्रक्रियेला अधिक गती मिळत आहे. आगामी काळातही सेवा कर संकलन वाढविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल.”

-अण्णा बोदडे , उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# कार फोडून नागरिकांना जीवे मारण्याची धमकी; पाच जणांवर गुन्हा

» पिंपरी | प्रतिनिधी

**संभाजीनगर परिसरात भररस्त्यात लोखंडी कोयत्याने कारची तोडफोड करत नागरिकांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी निगडी पोलिसांनी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**





ही घटना ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास वृंदावन सोसायटीसमोर, रामेश्वर मंदिराजवळ घडली. ऋषिकेश संजय वराडी (वय २८) यांनी रस्त्यालगत पार्क केलेल्या फोक्सवॅगन व्हेंटो कारवर आरोपींनी लोखंडी कोयत्याने हल्ला केला. कारच्या काचा आणि बोनेटची तोडफोड करण्यात आली असून सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.तोडफोडीनंतर आरोपींनी उपस्थित नागरिकांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.याप्रकरणी नागेश चोपडे, अभिषेक यादव, अभिषेक गोसावी, सिद्धार्थ माने आणि एका साथीदाराविरोधात संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. आरोपींचा शोध सुरू असून पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त PCMC कडून अभिवादन!

## महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संदेश; मान्यवरांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

**राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.**



या कार्यक्रमाला महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते युवराज दाखले तसेच महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही महान नेत्यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांना अभिवादन केले. महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सत्य, अहिंसा, असहकार आणि सत्याग्रह या मूल्यांच्या बळावर ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक जनआंदोलन उभारले.

त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा मिळाली. असहकार आंदोलन, दांडी यात्रा, भारत छोडो आंदोलन यांसारख्या चळवळींमधून त्यांनी सर्वसामान्य जनतेला स्वातंत्र्यलढ्यात सहभागी करून घेतले. त्यामुळे स्वातंत्र्यलढा हा केवळ काही नेत्यांचा किंवा संघटनांचा राहिला नाही, तर तो देशातील कोट्यवधी नागरिकांचा जनलढा बनला. गांधीजींनी केवळ राजकीय स्वातंत्र्याचीच नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचीही भूमिका मांडली. सत्य आणि अहिंसा ही त्यांच्या जीवनाची मूलभूत तत्त्वे होती. स्वच्छता, ग्रामविकास, स्वावलंबन, सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता आणि मानवी मूल्यांचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचला पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. साधे जीवन, उच्च विचार आणि जनसेवा या मूल्यांमुळे गांधीजी आजही जगभर प्रेरणास्थान मानले जातात. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनीही देशाच्या सार्वजनिक जीवनात साधेपणा, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श निर्माण केला. स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतल्यानंतर त्यांनी स्वतंत्र भारताच्या राजकारणात विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.

अत्यंत साधी राहणी आणि स्पष्ट विचारसरणी यामुळे त्यांना देशवासीयांचा मोठा विश्वास लाभला. पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात देशासमोर निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीत लाल बहादूर शास्त्री यांनी धैर्याने नेतृत्व केले. भारतीय सैन्याचे मनोबल वाढवतानाच देशातील शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित करणारा “जय जवान, जय किसान” हा संदेश त्यांनी दिला. या घोषणेने सैनिक आणि शेतकरी हे देशाच्या प्रगतीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट केले.

राष्ट्रीय एकात्मता आणि देशहितासाठी त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे त्यांचे नाव भारतीय राजकारणाच्या इतिहासात आदराने घेतले जाते. गांधीजींचा अहिंसेचा मार्ग आणि शास्त्रीजींची साधी, प्रामाणिक व राष्ट्रनिष्ठ जीवनशैली या दोन्ही गोष्टी आजच्या समाजासाठीही तितक्याच मार्गदर्शक आहेत.

सार्वजनिक जीवनात पारदर्शकता, स्वच्छता, जबाबदारी, सामाजिक सलोखा आणि नागरिकांप्रती संवेदनशीलता या मूल्यांची जपणूक करणे हीच या महापुरुषांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या अभिवादन कार्यक्रमातून राष्ट्रसेवा, प्रामाणिकपणा, स्वच्छता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.

# दिवेआगार दुर्घटनेनंतर विनर्स अकादमीला टाळे!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**दिवेआगार येथे सहलीदरम्यान झालेल्या भीषण दुर्घटनेत आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यानंतर शहरातील कोचिंग क्लासेस आणि विविध शैक्षणिक आस्थापनांच्या सुरक्षेबाबत आळंदी नगरपरिषद प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील शैक्षणिक संस्थांची तपासणी मोहीम सुरू करण्यात आली असून, या मोहिमेअंतर्गत विनर्स अकादमीवर कारवाई करत संबंधित मिळकत सील करण्यात आली आहे.**






दिवेआगार दुर्घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यानंतर शहरातील कोचिंग क्लासेस, खासगी शैक्षणिक संस्था आणि अन्य आस्थापनांकडे आवश्यक परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्रे तसेच नगरपरिषदेच्या नियमांचे पालन केले जाते की नाही, याची तपासणी प्रशासनाकडून करण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान नगरपरिषदेच्या पथकाने विनर्स अकादमीच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली.

श्री. नारायण हरिभाऊ दस यांच्या मालकीच्या मालमत्ता क्र. जुना ११३७, नवीन LAN00001729 या ठिकाणी संबंधित कोचिंग क्लास सुरू असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. तपासणीदरम्यान विनर्स अकादमीकडे नगरपरिषदेचा आवश्यक व्यवसाय परवाना तसेच ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याची नोंद उपलब्ध नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

त्यानंतर संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या आदेशानुसार कर विभाग प्रमुख सीमा चारवे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या पथकाने संबंधित मिळकत सील केली. कारवाईदरम्यान पोलीस प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारीदेखील उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. नगरपरिषदेच्या हद्दीत व्यवसाय अथवा शैक्षणिक आस्थापना चालविताना आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक आहे.

विनापरवाना किंवा आवश्यक NOC शिवाय आस्थापना चालविणाऱ्यांविरोधात नियमानुसार कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून प्रशासनाने दिला आहे. दिवेआगार दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी तडजोड केली जाणार नसल्याचे प्रशासनाच्या भूमिकेतून स्पष्ट होत आहे. शैक्षणिक संस्थांच्या इमारती, उपलब्ध सुविधा, आवश्यक परवाने आणि नियमानुसार असलेल्या बाबींची तपासणी आता अधिक काटेकोरपणे केली जात आहे. शहरातील इतर कोचिंग क्लासेस आणि शैक्षणिक आस्थापनांची तपासणीही सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन आढळल्यास नोटीस, सील किंवा अन्य कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

त्यामुळे आवश्यक परवाने आणि कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या सूचना संबंधित आस्थापनांना देण्यात येत आहेत. आठ विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटनेनंतर प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे आळंदीतील शैक्षणिक आस्थापनांमध्ये खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर नगरपरिषद प्रशासनाचा भर राहणार असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

### नियमबाह्य क्लासेसवर कारवाईचा इशारा!

दिवेआगार दुर्घटनेनंतर आळंदी नगरपरिषदेने शहरातील कोचिंग क्लासेस व शैक्षणिक आस्थापनांची तपासणी अधिक तीव्र केली आहे. आवश्यक व्यवसाय परवाना, ना-हरकत प्रमाणपत्र तसेच इतर नियमांची पूर्तता न करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. विनर्स अकादमीवरील सील कारवाईनंतर शहरातील इतर क्लासेसचीही तपासणी सुरू असून, नियमभंग आढळल्यास संबंधित आस्थापनांवर सीलसह कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

# आळंदी शोकमग्न; आज आळंदी-केळगाव बंद!

## आठ विद्यार्थ्यांना श्रद्धांजली; व्यापारी, संस्था आणि नागरिकांचा स्वयंस्फूर्त प्रतिसाद

**» पुणे | प्रतिनिधी**

**दिवेआगार येथे सहलीदरम्यान घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण आळंदी आणि केळगाव परिसरावर शोककळा पसरली आहे. मृत विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी आज आळंदी आणि केळगाव बंदचे आवाहन करण्यात आले आहे.**



आळंदी देवाचीचे नगराध्यक्ष प्रशांत पोपटराव कुऱ्हाडे तसेच समस्त आळंदी आणि केळगाव ग्रामस्थांच्या वतीने व्यापारी, व्यावसायिक, संस्था, संघटना आणि नागरिकांना या बंदमध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या आवाहनाला विविध व्यापारी संघटना आणि स्थानिक नागरिकांकडून प्रतिसाद मिळत असून अनेक व्यावसायिकांनी आपली दुकाने व आस्थापने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दिवेआगार दुर्घटनेने आळंदी शहराला मोठा धक्का बसला आहे. सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या अकाली मृत्यूमुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवार, शिक्षक आणि नागरिकांमध्ये तीव्र दुःख आणि हळहळ व्यक्त होत आहे.

मृत विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ शहरातील विविध भागांत श्रद्धांजली कार्यक्रम आणि प्रार्थना सभांचे आयोजन करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आजचा बंद हा कोणत्याही राजकीय अथवा व्यावसायिक मागणीसाठी नसून मृत विद्यार्थ्यांप्रती सामूहिक शोक व्यक्त करण्यासाठी असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. शहरातील नागरिकांनी शांततेत आणि स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. बंदच्या काळात नागरिकांची अत्यावश्यक कामे अडचणीत येऊ नयेत, यासाठी रुग्णालये, औषध दुकाने, रुग्णवाहिका सेवा तसेच इतर अत्यावश्यक सेवांना बंदमधून वगळण्यात आले आहे. आरोग्याशी संबंधित सेवा नियमित सुरू ठेवण्यात येणार आहेत. शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी मृत विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ व्यवहार बंद ठेवून शोक व्यक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्थानिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही या बंदला पाठिंबा दर्शवत मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. दिवेआगार दुर्घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नदेखील पुन्हा ऐरणीवर आला आहे. शालेय आणि खासगी सहलींचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, संबंधित परवानग्या आणि सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. आठ विद्यार्थ्यांच्या मृत्यूने आळंदीच्या सामाजिक जीवनावर खोल परिणाम झाला असून, शहर आज सामूहिक दुःख व्यक्त करत आहे. बंदच्या माध्यमातून मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहतानाच त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी संपूर्ण आळंदी आणि केळगाव उभे असल्याचा संदेश देण्यात येत आहे.

### अत्यावश्यक सेवा सुरू राहणार

आळंदी आणि केळगाव बंददरम्यान रुग्णालये, औषध दुकाने, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवा सुरू राहणार आहेत. नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी या सेवांना बंदमधून वगळण्यात आले आहे. मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नागरिकांनी शांततेत आणि स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुसाट; आणखी ५ स्थानकांना लवकरच मंजुरी!

**» पुणे | प्रतिनिधी**

**माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका-३ आता प्रत्यक्ष प्रवासी सेवेकडे आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत आहे. या मार्गावरील आणखी पाच स्थानकांना मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची (CMRS) मंजुरी मिळण्याची अपेक्षा असून, ती मिळाल्यानंतर एकूण १७ स्थानकांवरून सेवा सुरू करण्याचा मार्ग खुला होऊ शकतो. या मार्गिकेवरील पहिल्या १२ स्थानकांना यापूर्वीच CMRS कडून परवानगी मिळाल्याचे वृत्त आहे.**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी मार्गिका-३च्या कामांचा आढावा घेतला आहे. मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून, शिवाजीनगरच्या दिशेने पुढील टप्प्यातील स्थानकांसाठी आवश्यक सुरक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. अतिरिक्त पाच स्थानकांना मंजुरी मिळाल्यास PMRDA ला १७ स्थानकांचा मोठा टप्पा प्रवासी सेवेसाठी खुला करता येणार आहे.

METRO RAIL NEWS या मार्गिकेतील जिल्हा न्यायालय परिसर हा प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा इंटरचेंज पॉइंट ठरणार आहे. येथील जोडणीमुळे PMRDA ची मार्गिका-३ आणि महामेट्रोच्या विद्यमान मार्गांमध्ये प्रवास बदलणे अधिक सुलभ होणार आहे.

परिणामी हिंजवडीकडून येणाऱ्या प्रवाशांना पिंपरी-चिंचवड, कोथरूड आणि रामवाडीच्या दिशेने पुढील प्रवासासाठी मेट्रो नेटवर्कचा फायदा घेता येईल. मार्गिका-३ ही सुमारे २३.२३ किलोमीटर लांबीची असून एकूण २३ स्थानके प्रस्तावित आहेत. ही मार्गिका हिंजवडीच्या आयटी हबला बालेवाडी, बाणेरमार्गे मध्य पुण्याशी जोडणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर हिंजवडी-पुणे दरम्यानच्या दैनंदिन वाहतूक कोंडीला सार्वजनिक वाहतुकीचा महत्त्वाचा पर्याय उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे. METRO RAIL NEWS CMRS ने २३ जुलै रोजी पहिल्या १२ स्थानकांच्या टप्प्याला मंजुरी दिल्याची माहिती आहे.

त्यानंतर PMRDA ने सुरुवातीची सेवा केवळ १२ स्थानकांपुरती मर्यादित न ठेवता आणखी पाच स्थानके त्यात समाविष्ट करण्याची तयारी सुरू केली. या स्थानकांच्या सुरक्षा तपासणीची प्रक्रिया पुढे नेण्यात आली असून अंतिम मंजुरीनंतर १७ स्थानकांतून प्रवासी सेवा सुरू करण्याचा पर्याय उपलब्ध होईल. METRO RAIL NEWS मात्र मेट्रोच्या प्रत्यक्ष उद्घाटनाची निश्चित तारीख अद्याप अधिकृतरीत्या जाहीर झालेली नाही.

त्यामुळे CMRS ची उर्वरित मंजुरी, प्रकल्पातील अंतिम कामे आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच प्रवासी सेवेला नेमकी सुरुवात कधी होणार हे स्पष्ट होईल. METRO RAIL NEWS हिंजवडीतील आयटी कर्मचारी आणि पिंपरी-चिंचवड-पुणे दरम्यान दररोज प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांसाठी ही मार्गिका महत्त्वाची ठरणार आहे. १७ स्थानकांचा टप्पा सेवेत आल्यास मेट्रो मार्गिका-३च्या प्रत्यक्ष वापराचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

### १७ स्थानकांपर्यंत सेवा विस्ताराची तयारी

मेट्रो मार्गिका-३वरील १२ स्थानकांना यापूर्वीच CMRSची मंजुरी मिळाली असून, आणखी पाच स्थानकांची तपासणी पूर्ण झाली आहे. अंतिम सुरक्षा मंजुरी मिळाल्यानंतर माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील एकूण १७ स्थानकांतून प्रवासी सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे हिंजवडी आयटी हब आणि पुणे शहरातील दळणवळण अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

# सिप्लाच्या पुणे गोदामावर FDAचा मोठा दणका!

## पॅकेजिंगवरील नियमबाह्य दावे, साठवणूक आणि नोंदीतील त्रुटींवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

**औषधांच्या पॅकेजिंगवरील नियमबाह्य दावे, गोदामातील साठवणुकीतील त्रुटी आणि औषधांच्या नोंदींमध्ये आढळलेल्या तफावतींच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) सिप्ला फार्मा अँड लाईफ सायन्सेस लिमिटेडच्या पुण्यातील वडकी येथील गोदामाचे घाऊक औषध विक्री परवाने रद्द केले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कंपनीला बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर १ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली.**





FDAच्या तपासणीत ‘REACTIN PLUS’ या औषधाच्या पॅकेजिंगवर डोकेदुखी, स्नायुदुखी, पाठदुखी, सांधेदुखी आणि दातदुखीपासून त्वरित आराम मिळतो, असे दावे आढळले. औषधाच्या बॉक्सवर मानवी आकृतीच्या माध्यमातून स्नायुदुखी कमी होत असल्याचेही दर्शवण्यात आले होते. या पद्धतीचे दावे औषधविषयक नियमांशी सुसंगत नसल्याचे प्रशासनाच्या तपासणीत नमूद करण्यात आले. गोदामातील औषधसाठ्याच्या व्यवस्थापनातही गंभीर त्रुटी आढळल्याचा FDAचा दावा आहे. औषधांचे बॉक्स योग्य रॅक किंवा पॅलेट्सवर ठेवण्याऐवजी थेट जमिनीवर ठेवण्यात आल्याचे तपासणीत दिसून आले. काही साठ्यावर धूळ साचलेली होती, तर गोदामाच्या स्वच्छतेबाबतही त्रुटी नोंदवण्यात आल्या.

मुदतबाह्य औषधांसाठी स्वतंत्र जागा निश्चित नसणे, अशा औषधांवर ‘विक्रीसाठी नाही’ अशी स्पष्ट खूण नसणे आणि मुदतबाह्य औषधांची विल्हेवाट लावण्यासंदर्भातील आवश्यक कार्यपद्धती व नोंदी उपलब्ध नसणे, या बाबीही तपासणी अहवालात नमूद करण्यात आल्या. याशिवाय तपासणीसाठी आवश्यक फॉर्म ३५ पुस्तक उपलब्ध नसणे तसेच खरेदी-विक्रीच्या पावत्यांमध्ये त्रुटी आढळल्याचे FDAने म्हटले आहे.

संगणकीय नोंदी आणि प्रत्यक्ष औषधसाठा यामध्येही तफावत आढळली असून, या तफावतीत प्रतिजैविक औषधांचाही समावेश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. केवळ संगणकीय प्रणालीमध्ये औषधांच्या नोंदी असल्यामुळे प्रत्यक्ष साठा, साठवणूक आणि कायदेशीर कागदपत्रांबाबतची जबाबदारी संपत नाही, अशी भूमिका FDAने घेतली आहे.

औषधांची विक्री व वितरण करणाऱ्या कंपनीवर पॅकेजिंगपासून बाजारातील विक्रीपर्यंत संबंधित नियमांचे पालन करण्याची जबाबदारी असल्याचेही परवाना प्राधिकरणाने नमूद केले. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार यापूर्वीची कारवाई मागे घेऊन नव्याने प्रक्रिया करण्यात आली. त्यानुसार FDAने ४ सप्टेंबर २०२६ रोजी कंपनीला सुधारित कारणे दाखवा नोटीस बजावली. कंपनीने ११ सप्टेंबर रोजी लेखी उत्तर सादर केले, तर २१ सप्टेंबर रोजी वैयक्तिक सुनावणीची संधी देण्यात आली. कंपनीचे लेखी उत्तर, सुनावणीदरम्यान मांडलेली बाजू, तपासणी अहवाल आणि संबंधित कायदेशीर तरतुदींचा विचार केल्यानंतर १ ऑक्टोबर रोजी वडकी येथील गोदामाचे घाऊक औषध विक्री परवाने रद्द करण्याचा आदेश देण्यात आला.

FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता, योग्य साठवणूक आणि विक्री-वितरणातील नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी अशा तपासण्या आणि कारवाया सुरूच राहतील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# डेटिंग अॅपवर मैत्रीचा सापळा; तरुणाला मारहाण करून २० हजार लुटले!

**पुणे | प्रतिनिधी**

**गे डेटिंग अॅपच्या माध्यमातून मैत्री करून एका २२ वर्षीय तरुणाला भेटण्याच्या बहाण्याने निर्जन ठिकाणी बोलावून त्याला बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतर धमकावून त्याच्या मोबाईलमधील ‘फोनपे’चा पासवर्ड मिळवत बँक खात्यातून २० हजार रुपये काढून घेतल्याची घटना येरवडा परिसरात घडली आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणाची गे डेटिंग अॅपवर एका मुलाशी ओळख झाली होती. सुरुवातीला दोघांमध्ये अॅपवरून संवाद सुरू झाला. काही काळ संभाषण झाल्यानंतर संबंधिताने प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा व्यक्त केली आणि तरुणाला पुण्यातील मेंटल हॉस्पिटल कॉर्नर परिसरात येण्यास सांगितले. ठरलेल्या वेळेनुसार फिर्यादी त्या ठिकाणी पोहोचला. मात्र, तेथे पोहोचल्यानंतर परिस्थिती अचानक बदलली. आरोपींनी त्याला परिसरातील एका पडक्या वसाहतीकडे नेले. त्यानंतर एका खोलीत नेऊन त्याच्याशी शिवीगाळ सुरू केली. देवेंद्र, अरबाज आणि त्यांचा एक साथीदार अशा तिघांनी मिळून तरुणाला मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

अचानक झालेल्या हल्ल्यामुळे तरुणाला स्वतःचा बचाव करण्याची संधी मिळाली नाही. आरोपींनी त्याला धमकावत त्याचा मोबाईल ताब्यात घेतला. मोबाईलमधील ‘फोनपे’ अॅपचा पासवर्ड सांगण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकण्यात आला. त्यानंतर आरोपींनी त्याच्या बँक खात्यातून २० हजार रुपये काढून घेतल्याचा आरोप आहे. एवढ्यावरच आरोपी थांबले नाहीत. हा प्रकार पोलिसांना सांगितल्यास किंवा कोणाकडे वाच्यता केल्यास जिवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या धमकीमुळे तरुण घाबरला होता. मात्र, त्यानंतर त्याने धाडस करून पुण्यातील विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात जाऊन संपूर्ण प्रकाराची माहिती दिली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी देवेंद्र, अरबाज आणि त्यांच्या एका साथीदाराविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तिसऱ्या आरोपीची ओळख आणि सर्व आरोपींच्या भूमिकेचा तपास सुरू आहे. आरोपींनी यापूर्वीही अशाच प्रकारे इतरांना लक्ष्य केले आहे का, या दृष्टीनेही पोलिस तपास करत आहेत. पुण्यात ऑनलाइन डेटिंग अॅपच्या माध्यमातून ओळख करून भेटीसाठी बोलावून लूट किंवा मारहाण करण्याचे प्रकार नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहेत.

अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन ओळख झाल्यानंतर प्रत्यक्ष भेटताना गर्दीचे आणि सुरक्षित ठिकाण निवडणे, आपल्या विश्वासू व्यक्तीला भेटीची माहिती देणे, लोकेशन शेअर करणे आणि मोबाईल बँकिंगचे पासवर्ड किंवा इतर आर्थिक माहिती कोणालाही न देणे महत्त्वाचे आहे. या घटनेनंतर डेटिंग अॅपच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणूक आणि गुन्हेगारीच्या प्रकारांबाबत पुन्हा एकदा सतर्कतेची गरज अधोरेखित झाली आहे. विश्रांतवाडी पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.